महा मेट्रो

PUNE METRO

# पुणे मेट्रो च्या कामासाठी नाशिक फाटा येथे वाहतुकीत बदल

## प्रेस नोट

पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी वाहतुक विभागातील पुणे मेट्रोचे कामाअंतर्गत एन. सी. सी. लिमिटेड कंपनीतर्फे जुन्या मुंबई पुणे महामार्गावर नाशिकफाटयालगत मुंबईकडे जाणा-या सर्व्हिस रस्ता व ग्रेड सेपरेटर चा रस्ता मधे मेट्रो भोसरी स्थानकाची पिअर व बिम याचे काम करावयाचे असल्याने सदर रस्त्याने जाणारी वाहतुक खालील मार्गाने वळविण्यात येणार आहे त्याबाबतची परवानगी मा. पोलिस उपआयुक्त वाहतुक पिंपरी चिंचवड कार्यालयीन, क्र. जा क्र. पोउआ/वाह/नियो/929/2019 दि 08.07.2019 अन्वये घेण्यात आली आहे. तरी सदर रस्त्यावरील मेट्रो प्रकल्पाचे काम पुर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीमध्ये बदल करणेत येत आहे.

नाशिक फाटा येथे भोसरी मेट्रो स्टेशनचे काम सुरू होणार असल्याने पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणारी सेवा रस्त्यावरील व ग्रेड सेपरेटर रस्त्यावरील वाहतुक रात्री 23:00 वा. ते दूस-या दिवशी पहाटे 05:00 वाजे पर्यंत नाशिक फाटा ते कासारवाडी रेल्वे स्टेशन (इंडियन ऑईल पेट्रोल) शंकरवाडी वाहतुक एक वेळेस सेवा रस्ता किंवा ग्रेड सेपरेटर रस्ता बंद राहील अशी बंद ठेवणेत येत आहे. भोसरी मेट्रो स्टेशनचे काम होईपर्यंत नाशिक फाटा उडडाणपुलाचा पिंपरीकडे (मुंबई) जाणारा डाउन रॅम्प बंद ठेवण्यात येत असून त्यामुळे जड वाहनांनी सी.आय.आर.टी. येथे युटर्न् घेवून नाशिक फाटा चौकात येवून पिंपरी मुंबईकडे जावे. 4.50 मी. पेक्षा जास्त उंचीच्या वाहनांनी मुंबई-पुणे ग्रेड सेपरेटर रस्त्याने डाव्या बाजुने 320.00 मी. अंतरापर्यंत विरूध्द दिशेने जाउन इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर नवीन मार्ग आउटमधून डावीकडे वळून सेवा रस्त्याने पिंपरी मुंबईकडे जावे.

तरी नागरीकांनी मेट्रोचे कामात सहकार्य करावे

## <u>प्रेस नोट</u>

जा.क्र.पोउआ/वाहतुक/९२९/२०१९ पिंपरी चिंचवड शहर दिनांक-०५/०७/२०१९

पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी वाहतुक विभागाचे हद्दीत सर्विस रोडला व ग्रेड सेपरेटर (मुंबईकडे जाणारा रस्ता)मेट्रो भोसरी स्थानकाचे काम चालु आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम. व्ही.ए. ०११६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन विनायक ढाकणे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर नाशिक फाटा ते इंडियन ऑईल पेट्रोल पंपापर्यंत मुंबईकडे जाणा-या व मुंबईकडून पुण्याकडे येणा-या ग्रेड सेपरेटर रोडवर खालीलप्रमाणे तात्पुरते बदल करण्यात येत आहेत.

- नाशिक फाटा येथे भोसरी मेट्रो स्टेशनचे काम सुरु होणार असल्याने पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणारी सेवा रस्त्यावरील व ग्रेड सेपरेटर रस्त्यावरील वाहतूक रात्री २३.०० वा. ते दुस-या दिवशी पहाटे ०५.०० वाजे पर्यंत नाशिक फाटा ते कासारवाडी रेल्वे स्टेशन (इंडियन ऑईल पेट्रोल) शंकरवाडी वाहतूक एक वेळेस सेवा रस्ता किंवा ग्रेड सेपटर रस्ता बंद राहील अशी बंद ठेवणेत येत आहे. भोसरी मेट्रो स्टेशनचे काम होईपर्यंत नाशिक फाटा उड्डाणपुलाचा पिंपरीकडे (मुंबई) जाणारा डाऊन रॅम्प बंद ठेवणेत येत असून त्यामुळे जड वाहनांनी सी आय. आर टी. येथे यूटर्न घेवून नाशिक फाटा चौकात येवून पिंपरी मुंबईकडे जावे. ४.५० मी. पेक्षा जास्त उंचीच्या वाहनांनी मुंबई-पुणे ग्रेड सेपरेटर रस्त्याने डाव्या बाजूने ३२०.०० मी. अंतरापर्यंत विरुध्द दिशेने जाऊन इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोरील नवीन मार्ग आऊटमधून डावीकडे वळून सेवा रस्त्याने पिंपरी मुंबईकडे जावे.
- 

तरी वरील वाहतुक बदलाबाबत मेट्रोकडील मार्शल व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(विनायक ढाकणे)
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पिंपरी चिंचवड शहर

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-
१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.
२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक पिंपरी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार/ प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करुन त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टासह दोन दिवसात सादर करावी.

४) एक्झक्युटीव्ह डायरेक्टर महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरपोरेशन लि.पुणे
२/- [illegible] वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA
2019/7/10 14:53